# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे - ४११ ००१
Email Id :- mscepune@gmail.com    Website : www.mscepune.in    फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७

परीक्षा प्राधान्य

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./फेब्रु/मार्च-२०२२/3784/
दिनांक :- 10/ 12/२०२१

प्रति,

**संस्थाचालक / प्राचार्य**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- माहे फेब्रुवारी/मार्च २०२२ (द्वितीय सत्र)मधील जीसीसी, जीसीसी-टीबीसी आणि जीसीसी-एसएसडी-सीटीसी परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती क्षमापित करणेबाबत.**

**संदर्भ :-१.** महाराष्ट्र शासनाचे दि. ०४/०६/२०२१ च्या मार्गदर्शन सूचना.
**२.** शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण :२०२१/प्र.क्र.९४/एसडी-६ दि. ०७/०७/२०२१
**२.** या कार्यालयाचे जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ.३/(२४)/२०२१/२०४९ दि १२/०७/२०२१
३. या कार्यालयाचे जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशान/आ.३/२०२१/२४१८ दि. २४/०८/२०२१
**४.** शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय दि. ०५ डिसेंबर २०१६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये फेब्रुवारी / मार्च २०२२ मध्ये प्रस्तावित जीसीसी, जीसीसी-टीबीसी आणि जीसीसी-एसएसडी-सीटीसी परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. ३ च्या अनुषंगाने शासन निर्णायान्वये प्रसिद्ध महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारीत नियमावली २०१६ चे प्रकरण २ चे नियम १३ (क) नुसार उमेदवाराला / विद्यार्थ्यांला परीक्षेकरीता अर्ज करताना पात्रतेसाठी एकूण कामाच्या दिवसांपैकी ८०% उपस्थिती पूर्ण असणे बंधनकारक आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या अन्वये च्या अनुषंगाने दि. ०४ जून २०२१ पासून संचारबंदीत शिथिलता दिली होती.

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन परिपत्रकान्वये कोविड मुक्त क्षेत्रातील शैक्षणिक संस्था सुरु करणेस परवानगी दिली होती. शासकीय वाणिज्य संस्थांनी (संगणक टायपिंग, मॅन्युअल टायपिंग, लघुलेखन) अटींच्या अधिन राहून कार्यवाही करावी. वाणिज्य शैक्षणिक संस्थांना दिनांक १५ जुलै २०२१ पासून संस्था सुरु करणेस परवानगी देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ व संदर्भ क्र. ४ अन्वये महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारीत नियमावली २०१६ प्रकरण १ मधील मुद्या क्र. ११ (अ) (४) नुसार मी आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा, परिषद, पुणे माझ्या अधिकाराच्या अनुषंगाने कोविड -१९ व या महामारीच्या पार्श्वभूमीवर उपरोक्त अडचण लक्षात घेता ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२१ (प्रथम सत्र) मधील परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती ४०% असल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात आली होती.

त्याच प्रमाणे फेब्रुवारी / मार्च २०२२ (द्वितीय सत्र) मध्ये प्रस्तावित परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती ४०% असल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देत आहे. जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी संधी मिळेल. त्यानुसार योग्य ती कार्यवाही सर्व संबंधितांनी करावी.

**(तुकाराम सुपे )**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :-**

१. **विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)**